स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर

पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/ स्वयंअशाळा/५१५ /१५
पुणे १ दिनांक :- २२/०१/२०१५

प्रति,

अध्यक्ष/सचिव,
आर्चएंजल एज्युकेशन फाऊंडेशन संचलित
कुंजीर पब्लिक स्कूल, मांजरी बु||, ता. हवेली जि. पुणे

विषय:- सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत.

संदर्भ:- १) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण (क्र. १ ,६ व २४) दि. २ जुलै २०१३.
२) शासन निर्णय एसएफएस-१११४/प्र.क्र.४०/एसएम-२ मंत्रालय, मुंबई ३२ दि. २६ फेब्रुवारी २०१४..
३) मा.शिक्षणउपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील आदेशक्र. शिउसं/प्राथ-२/१३/स्वयंअशाळा/मान्यता ११०९५/९८/पुवि/१४ दि.१७ मे २०१४.

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयानुसार नविन शाळा स्थापन करणेकरिता /विद्यमान शाळेचा दर्जा वाढ करण्याकरिता खालील अटी व शर्तीवर प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | मुळ यादीतील क्रमांक | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पुर्ण पत्ता | माध्यम | शाळा सुरु केल्याचा दिनांक | नविन शाळा/ दर्जा वाढ | शाळेचा प्रकार (प्राथमिक/उच्च प्राथमिक) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ७ | ८ | ९ |
| १ | २१५ | आर्चएंजल एज्युकेशन फाऊंडेशन मांजरी बु|| ता. हवेली जि. पुणे | कुंजीर पब्लिक स्कूल, मांजरी बु||, ता. हवेली जि. पुणे | इंग्रजी | २०१४-१५ | नविन शाळा | प्राथमिक |

अटी व शर्ती

१. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.
२. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरीक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
३. या अधिनियमातील तरतुदीनूसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी दिलेली आहे.
४. संदर्भ क्रमांक ०३ अन्वये सन २०१४-१५ मध्ये सुरु असलेल्या वर्गासह परवानगी देण्यात येत आहे.
५. परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.
६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.
७. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा/वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.
८. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
९. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना **UDISE** मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित शाळा/ वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

प्रत माहितीसाठी सविनय सादर-
१. मा. सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा. शिक्षण संचालक(माध्य.व उच्च माध्य.), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१.
३. मा. शिक्षण संचालक(प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१.
४. मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-०१.
५. शिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका, पुणे-५.

पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/ स्वयंअशाळा/157 /19
पुणे 1 दिनांक :- 3 /9 /2019

प्रति,

अध्यक्ष/ सचिव/मुख्याध्यापक,
आर्च एंजल एज्युकेशन फौडेशन,स.नं.7/2/2/मांजरी बु,ता.हवेली,जि.पुणे संचलित कुंजीर पब्लिक स्कूल, सर्वे नं.7/2/2 मांजरी बु. ता.हवेली, जि.पुणे

**विषय:-** सन 2015-16 या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत.

**संदर्भ-** 1. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र 1, 6 व 24) 2013
2.शासन निर्णय जा.क्र.एसएफएस-1017/प्र.क्र.624/एसएम-2 दिनांक-14.11.2017
3.शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे योच पत्र क्र.शिउंस/माध्य-202/स्वंयअशाळा/मान्यता/पुवि/2018-19/8779,दि.6.12.2017

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने नविन शाळा करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र. 2 च्या निर्णयानुसार **खालील अटी व शर्तीवर विद्यमान शाळा प्राथमिकला जोडुन उच्च प्राथमिक इ.6 वी ते इ. 8 वी प्रथम मान्यता देण्यात येत आहे.**

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पुर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग / इयत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1 | **आर्च एंजल एज्युकेशन फौडेशन,स.नं.7/2/2/मांजरी बु,ता.हवेली,जि.पुणे** | **कुंजीर पब्लिक स्कूल, सर्वे नं.7/2/2 मांजरी बु. ता.हवेली, जि.पुणे** | इंग्रजी | दर्जा वाढ (राज्य मंडळ) | प्राथमिकला जोडुन ते उच्च प्राथमिक इ.6 वी ते इ.8 वी | 2016-17 |

**अटी व शर्ती**

1.संस्थेने वर्ग परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.
2.शासनाने ज्या ठिकाणासाठी नविन शाळा परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरीक्त अन्य ठिकाणी वर्ग सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
3.संदर्भ क्रमांक-2 चे शासन निर्णयातील क्र.1 नूसार किमान 1 एकर सलग जागा शाळेसाठी योग्य असण्याचे अटीचे कायम पूर्ततेचे अधिन राहुन. तसेच जागेबाबत मा.न्यायालयीन वाद उत्पन्न झाल्यास मा.न्यायालयाचे होणा-या आदेशास अधिन राहुन परवानगी देणेत येत आहे.
4.या अधिनियमातील तरतुदीनूसार वर्ग करण्यास दिलेली परवानगी दिलेली आहे.
5.संदर्भ क्रमांक 02 अन्वये सन-2017-18 मध्ये नविन शाळा परवानगी देण्यात येत आहे. परवानगी मिळाल्या पासून अठरा महिन्याच्या आत वर्ग सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.
6.परवानगी देण्यात आलेल्या वर्ग शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.
7. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.
8. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
9. शासन निर्णय जा.क्र. एसएफएस-1017/प्र.क्र.624/एसएम-2 दिनांक-14.11.2017 तील अटी शर्तीतील मददा क्र.2 चे पूर्ततेच्या अधिन राहुन मान्यता देणेत येत आहे.
10. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.
11. शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

**प्रत माहितीसाठी सविनय सादर-**
**1)मा. अवर सचिव, शालेय शिक्षणवक्रीडाविभाग, मंत्रालय, मुंबई-32.**
**2)मा. शिक्षण संचालक(माध्य.व उच्च माध्य.), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-1**
**3)मा. शिक्षण संचालक(प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-1.**

पुणे जिल्हा परिषद

# माध्यमिक शिक्षण विभाग

यशवंतराव चव्हाण भवन (जुनी इमारत), सोमवार पेठ, पुणे-११

परवानगी वर्ष-[illegible]
परवानगी प्रकार- दर्जावाढ
शाळा सुरु वर्ष-[illegible]

जाक्र.पुजिप/उच्च.माध्य/२०२०/ 3039 /२०
दिनांक:- २९ /१०/२०२०

**स्वयंअर्थसहायित तत्त्वारील परवानगीप्राप्त शाळा**
**प्रथम मान्यता**

**प्रति,**

**१. अध्यक्ष/सचिव, आर्च एंजल एज्युकेशन फौंडेशन, स.नं७/२/२/मांजरी बु, ता.हवेली जि पुणे**
**२. मुख्याध्यापक/प्राचार्य, कुंजीर पब्लीक स्कुल, स.नं७/२/२/मांजरी बु, ता.हवेली जि पुणे**

**विषय :- स्वयंअर्थसहायित तत्त्वावर नवीन शाळेस प्रथम मान्यता देणेबाबत.**
**(इयत्ता-९ वी १० वी प्रथम)**

**संदर्भ :-** १.माध्यमिक शाळा संहिता आणि महाराष्ट्र स्वयंअर्थसहायित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम-२०१२.
२. शासन निर्णय क्र.एसएफएस-१०१६/प्र.क्र.१४२/एस.एम-२ दि.१४ जुलै,२०१७.
३. शिक्षण उपसंचालक,पुणे यांचेकडील पत्र जाक्र.उमाशि-४०१/पुवि/१३७० दि.१२/०२/२०२०.
४. शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचेकडील शासन निर्णय जा.क्र.एसएफएस-१०१९/प्र.क्र.१०८२/एसएम-२ दिनांक.२० सप्टेंबर,२०१९
**५. संबंधित शाळेकडील प्रस्ताव दिनांक-०६/०१/२०२०.**

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, आपल्या संस्थेस महाराष्ट्र स्वयंअर्थसहायित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम-२०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणेस/ विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी संदर्भ क्र.४ अन्वये शासन परवानगी देण्यात आलेलीं आहे. त्यानुसार विहित कालावधीत वर्ग सुरु करुन त्यांना मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव आपण संदर्भ क्र.५ अन्वये या कार्यालयास सादर करण्यात आलेला होता. आपले प्रस्तावानुसार शाळेने पुढीलप्रमाणे वर्ग सुरु केलेले असून सदर वर्गांना खाली नमूद अटी व शर्तींच्या अधीन राहून प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| शासन निर्णय, यादीतील क्रम | संस्थेचे नाव | शाळेचे नाव | माध्यम | शिक्षण मंडळ | मान्यता वर्ग (इयत्ता व शाखा) | मान्यता वर्ष | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **शासन निर्णय जा.क्र.एसएफएस-१०१९/प्र.क्र.१०८२/एसएम-२ दिनांक.२० सप्टेंबर, २०१९** | **आर्च एंजल एज्युकेशन फौंडेशन, स.नं७/२/२/मांजरी बु, ता.हवेली जि पुणे** | **कुंजीर पब्लीक स्कुल, स.नं७/२/२/मांजरी बु, ता.हवेली जि पुणे** | **इंग्रजी** | **नविन शाळा** (राज्यमंडळ) | **इ ९ वी प्रथम इ १० वी प्रथम** | २०१९-२० | |
| यादीतील क्रमांक — स्वतंत्र आदेश | | UDISE-२७२५०५०९२२२ | | | | | |

**अटी व शर्ती-**

१. सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तिच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम-२००९ मधील तरतूदींची व त्या अंतर्गत वेळोवेळी विहित करण्यात आलेल्या सर्व नियमांची पूर्तता करणे आवश्यक आहे.
२. परवानगी देण्यात आलेल्या शाळेस, (अ)शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे व कार्यपद्धतीचे तसेच, (ब)महाराष्ट्र स्वयंअर्थसहायित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम-२०१२ मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील.
३. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणी शाळा सुरु करण्यास परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी व मान्यता आपोआप रद्द समजण्यात येईल.
४. U-DISE (Unified District Information System for Education) यु-डाईस कोड प्राप्त करुन घेणे व दरवर्षी त्यामधील माहिती अद्ययावत करणेची जबाबदारी संबंधित संस्था/शाळेची राहील.
५. सर्व संबंधितांच्या माहितीसाठी **स्वयंअर्थसहायित तत्त्वारील नवीन/दर्जावाढ परवानगीप्राप्त शाळा** असा जाहीर फलक शाळेच्या प्रवेद्वारावर लावणे आवश्यक राहील.
६. जे वर्ग सुरु करण्यास शासनाने परवानगी दिलेली आहे त्या वर्गाव्यतिरिक्त इतर वर्ग चालविता येणार नाहीत.
७. SARAL (Systematic Administrative Reforms for Achievment of Learning By Students) सरल प्रणालीवर (शाळा, विद्यार्थी, शिक्षक,इत्यादी बाबतची) माहिती भरणे व ती वेळोवेळी अद्ययावत करणे आवश्यक राहील.
८. शाळेतील आवश्यक सर्व नोंदी व अभिलेखे अद्ययावत ठेवून ते वेळोवेळी प्रमाणित करुन घ्यावेत.

कृ.मा.प

९. वर्गामध्ये विहित प्रवेश क्षमतेच्या मर्यादेत विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत. पटपडताळणी/संचमान्यता दरवर्षी करुन घेण्यात यावी.

१०. शाळेत पात्राताधारक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची नियुक्ती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणानुसार करावी.

११. शाळेतील नियुक्त मुख्याध्यापक अथवा शिक्षकांना खाजगी शिकवणी वर्गांमध्ये काम करता येणार नाही याची दक्षता घ्यावी.

१२. व्यवस्थापकीय संस्था ही, विहित केलेले नियम, मानके व प्रमाणकांनुसार शाळा चालविली जात असल्याची खात्री करुन घेईल व दर्जेदार शिक्षण देण्यास बांधील असेल.

१३. शासनाचे वतीने एखाद्या अधिकाऱ्यास आवश्यक असेल तेव्हा कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत केव्हाही शाळेत प्रवेश करता येईल व तिची तपासणी करता येईल.

१४. याद्वारे ज्या वर्गांना स्वयंअर्थसहायित तत्वावर मान्यता देण्यात आली आहे त्यांना भविष्यात कधीही शासकीय अनुदान तसेच कोणत्याही प्रकारचे आर्थिक साहाय्य देय असणार नाही.

१५. शालेय शुल्क निश्चित करताना, महाराष्ट्र शैक्षणिक शुल्क (विनियमन) अधिनियम-२०११ आणि महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध) अधिनियम-१९८७ मधील तरतूदी तसेच शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या कार्यपध्दतीचे पालन करावे.

१६. शाळा बंद करणे- शासनास किमान अठरा महिन्यांची पूर्वसूचना दिल्याखेरीज स्वयंअर्थसहायित तत्त्वावर स्थापन केलेली शाळा बंद करता येणार नाही.

१७. एखाद्या शाळेने, त्यांना लागू असलेल्या कायद्यातील कोणत्याही तरतूदींचे किंवा नियमांचे उल्लंघन केल्यास किंवा शासनाने निर्धारित केलेली प्रमाणके किंवा मानके किंवा अटी व शर्तीची पूर्तता करणे थांबविल्यास, विद्यार्थ्यांच्या हिताला बाधा पोचविणारी कृती केल्यास किंवा दर्जाहीन शैक्षणिक कामगिरी केल्यास, शाळेची मान्यता/परवानगी काढून घेण्यात येईल.

१८. जनहित याचिका क्रमांक-४८३/०४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निदेशांनुसार खालील बाबींची पूर्तता करावी.

a. शाळेमध्ये पुरेशी व सुयोग्य अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी. (Fire Audit)

b. शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येऊ नयेत

c. शाळेच्या संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे.

d. शाळेची इमारत, सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building Code of India) अंतर्गत विहित केलेल्या मानकांप्रमाणे शाळेची इमारत बांधलेली असल्याची खात्री करावी

e. प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी. (Structural Audit)

f. ज्या मंडळाशी शाळा संलग्नित होणार आहे त्या मंडळाने विहित केलेले निकषांची पूर्तता करणे बंधनकारक राहील.

१९. संदर्भ क्र.२- शासन निर्णय दि.१४/०७/२०१७ व संदर्भ क्र.३ शिउसं पत्र दि.१२/०२/२०२० अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करून, माध्यमिक शाळा संहिता कलम-४ अन्वये सदर मान्यता देण्यात येत आहे.

२०. सदरची **प्रथम मान्यता** ही तात्पुरत्या स्वरुपाची असून पुढील पाच वर्षांकरिता लागू असेल. त्यानंतर **कायम मान्यता** घेण्यात यावी. शाळेची प्रगती विचारात घेऊन मान्यता पुढे चालू ठेवणेबाबत विचार करणेत येईल.

२१. पाच वर्षांच्या कालावधीनंतर कायमपणे मान्यता देण्याचा या कार्यालयाकडून विचार करण्यात येईल. मात्र शाळेने, या आदेशातील व इतर कायद्याने घालून दिलेल्या तसेच शासनाने वेळोवेळी विहित अटी व शर्ती पूर्ण करणे चालू ठेवले पाहिजे.

२१.१०.२०२०

(डॉ.गणपत मोरे)
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे

**प्रत, माहितीस्तव,**

**१.मा.विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे-१.**

**२.मा.विभागीय सचिव, पुणे विभागीय मंडळ, शिवाजीनगर, पुणे-५.**